इतर आपत्ती व्यवस्थापन प्रकल्पांतर्गत
जिल्हास्तरावर रंगीत तालीम घेण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग (मदत व पुनर्वसन)
शासन निर्णय क्रमांक :- आव्यप्र-२०१६/प्र.क्र.२४५/आव्यप्र-१
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- २६ मार्च, २०१८

वाचा :- १) गृह मंत्रालय, भारत सरकार यांचे आदेश क्र.३८-११/२०१६-एनडीएमए-II,दि. २९.०९.२०१६
२) प्रधान महालेखाकार, महाराष्ट्र-१ यांचे आदेश क्र.ख.वि./चा-१/म व वन वि/ युओआर-१३९/२०१६-१७/१८३१, दि.२२.०२.२०१७
३) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक :- आव्यप्र२०१६/प्र.क्र.२४५/ आव्यप्र-१, दि. ०६.१०.२०१७
४) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक :- आव्यप्र२०१६/प्र.क्र.२४५/ आव्यप्र-१, दि. २०.०१.२०१८

शासन निर्णय :-

संदर्भाधीन क्रमांक ४ येथील शासन निर्णय अधिक्रमित करुन केंद्र शासनाने आर्थिक वर्ष २०१६-१७ करीता स्कीम कोड १८३७ अंतर्गत Financial Support to State / UT for conduct of state/UT/District level Mock Exercise या योजनेच्या नांवे राज्यास उपलब्ध केलेला रु. ३६.०० लक्ष (रुपये छत्तीस लाख फक्त) एवढा निधी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना वितरीत करण्यास शासन मान्यता देत आहे.

लेखाधिकारी, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग यांनी वरील निधी राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना प्रत्येकी रु. १,००,०००/- (रुपये एक लाख फक्त) याप्रमाणे वितरीत करावा.

या कामी होणारा खर्च मागणी क्रमांक सी-६ २२४५ नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय्य ८० सर्वसाधारण ००१, संचालन व प्रशासन (०१) महाराष्ट्र राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (०१) (०१) महाराष्ट्र राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे कार्यालय स्थापन करणे व फर्निचर साधन सामुग्रीसह सुसज्जीकरण करणे (२२४५ २५८८) ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर) या लेखाशिर्षाखाली पुरवणी मागणीव्दारे सन २०१७-१८ करीता करण्यात आलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

हे आदेश वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक:- विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/ विनियम, भाग-२, दि. १७.४.२०१५ अन्वये वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ मधील भाग-पहिला उपविभाग - ३ मधील अनुक्रमांक ३ परि. १६६ अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकाराचा वापर करुन त्यामध्ये नमूद अटींच्या अधीन राहून तसेच वित्त विभागाच्या सहमतीने आणि त्या विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र. २२६/२०१७/व्यय-९, दिनांक १०.०७.२०१७ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०३२७१३५८१४८११९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Shrirang Shripati Gholap

Digitally signed by Shrirang Shripati Gholap
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=DMU/R AND R, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e1b6e289fe7dcde27c972916398d8220a134ed8ebf6439e54d1927c5c4b28bec, cn=Shrirang Shripati Gholap
Date: 2018.03.27 14:00:17 +05'30'

(श्रीरंग घोलप)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,
(१) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
(२) लेखाधिकारी, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मंत्रालय, मुंबई.
(३) महालेखापाल, मुंबई.
(४) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
(५) कक्ष अधिकारी (म-११) मदत व पुनर्वसन, मंत्रालय, मुंबई.
(६) निवड नस्ती.